सुधारित वंमनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठीत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना कुंठीत वेतनवाढी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,

वित्त विभाग,

शासन निर्णय, क्रमांकः वतन-१०९९/प्र.क्र.१/९९/सेवा-३,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी, १९९९.

वाचाः- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकःवेपुर-१२८८/५७९/सेवा-१०, दिनांक १४ ऑक्टोबर, १९८८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकःवेतन-१०९०/प्र.क्र.२२/९४/सेवा-३, दिनांक १२ सप्टेंबर, १९९४.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकःवेतन-१०९४/प्र.क्र.२२/सेवा-३, दिनांक २५ ऑक्टोबर, १९९७.

(४) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांकः १(९)/इ-III-अ/९७, दिनाक २२ जुलै, १९९८.

शासन निर्णय

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने उपरोल्लिखित दिनांक २२ जुलै १९९८ च्या आदेशान्वये जे केंद्र शासकीय कर्मचारी रु.२२,४०० पेक्षा अधिक कमाल वेतन नसलेल्या त्यांच्या पदांच्या सुधारित वेतनश्रेणीत कुंठीत झाले असतील त्यांना कुंठीत वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या ओत.

२. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अशा कुंठीत वेतनवाढीचा लाभ देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असे आदेश देत आहे की, जे राज्य शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ खाली सुधारित वेतनश्रेणीची निवड करतील आणि ज्यांच्या वेतनश्रेणींची कमाल मर्यादा रुपये २२,४०० पेक्षा अधिक नसेल आणि जे सुधारित वेतनश्रेणींच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील त्यांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर दर दान वर्षे पूर्ण झाल्यावर एक कुंठीत वेतनवाढ मंजूर करावी. ही वेतनवाढ वेतनश्रेणीमध्ये घेतलेल्या शेवटच्या वेतनवाढीच्या दराच्या समतुल्य असेल. अशा <u>कमाल तीन</u> वेतनवाढी देण्यात येतील.

३. ज्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन संबंधित सुधारित वेतनश्रेणीत दिनांक १-१-१९९६ रोजी कमाल वेतनावर निश्चित होईल अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १-१-१९९६ गणण्यात यावयाचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर कुंठीत वेतनवाढ अनुज्ञेय होईल. म्हणजेच, दिनांक १-१-१९९८ पूर्वी कोणताही शासकीय कर्मचारी पहिली कुंठीत वेतनवाढ मिळण्यास पात्र होणार नाही. त्याप्रमाणे असुधारित वेतनश्रेणीत जर काही कुंठीत वेतनवाढी या आधीच प्राप्त झाल्या असतील तर त्या सुधारित वेतनश्रेणीत अनुज्ञेय होणाऱ्या तीन कमाल वेतनवाढीसाठी जमेस धरण्यात येऊ नयेत.

४. सदर कुंठीत वेतनवाढी पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चितीसह महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता, निवृत्तीवेतनविषयक लाभ इत्यादी सर्व प्रयोजनार्थ विचारात घेण्यात याव्यात.

५. हे आदेश दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात येतील.

६. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. वि. लागवणकर,
शासनाचे उप सचिव.

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपुर,
महालेखापाल -१ (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई,

महालेखापाल -२ (लेखा परिक्षा) -२ महाराष्ट्र नागपुर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख,
* प्रबंधक उच्च न्यायालय, (मूळ शाखा) मुंबई,
* प्रबंधक उच्च न्यायालय, (अपील शाखा) मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्रमांक ३ व ४,
अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
सीनीयर रिसर्च ऑफीसर, मे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग)
खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक लेखा निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/ नागपुर/ औरंबाद /नाशिक/अमरावती,
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, सेवा -३, वित्त विभाग,
* पत्राद्वारे

Grant of stagnation increments to Government servants stagnating at the maximum of their revised scales of pay ......

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Finance Department,
Resolution No.PAY-1099/CR-1/99/SER-3,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Dated :- 25th January,1999.

READ : (1) G.R.,F.D. No. RPS-1288/579/SER-10,
Dated 14th October, 1988.
(2) G.R.,F.D. No.PAY-1094/CR-22/94/SER-3,
Dated 12th September, 1994.
(3) G.R., F.D. No. PAY-1094/CR-22/SER-3,
Dated 25th October, 1997.
(4)Ministry of Finance Department of Expenditure, Office
Memorandum No.1(9)/E,III-A/79, dated 22nd
July,1988.

R E S O L U T I O N

In accordance with the provisions of the Government of India's aforesaid orders dated 22nd July, 1998, issued in pursuance of the recommendations of the Fifth Central Pay commission, Central Government employees, who have stagnated in the revised scale of pay, the maximum of which does not exceed Rs. 22400 have been granted stagnation increments.

2. The question of extending benefit of stagnation increments to State Govrnment employees was under consideration of Government. The Government is now pleased to direct that the State Government employees, who have opted for the revised scales of pay under Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998 the maximum of whose pay scale does not exceed Rs. 22400 and who may reach the maximum of their revised scales of pay, shall be granted one stagnation increment on completion of every two years at the maximum of their respective scales. The stagnation increments shall be equivalent to the rate of increment last drawn by them in the pay scales. A maximum of three such increments shall be allowed.

3 In the case of Government servants whose pay in the applicable revised scales is fixed at the maximum of the scales as on 1-1-1996, the stagnation increments in the revised scales of pay will be admissible only on expiry of a period of two years reckoned from 1st January, 1996 . In other words, no Government servant will become eligible for the first stagnation increment in the revised scale of pay before 1-1-1998 . Similarly the stagnation increments (s), if any, alraeady earned in the pre revised scales of pay will not be counted towards the maximum of three increments admissible in the revised scale of pay.

4. The stagnation increments will count for all purposes such as D.A., H.R.A., Pensionary benefits etc. including fixation of pay on promotion.

5. These orders shall take effect from 1st January, 1996.

By order and in the name of Governor of Maharashtra,

S.V.LAGWANKAR
Deputy Secretary to Government.